महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ९२ वा | शनिवार, दि.०१ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीत राजन पाटील, दिपक गायकवाड आणि आ. राजू खरेंच्या राजकीय कौशल्याचा कस लागणार

## महायुती मधील भाजपा -शिंदे शिवसेना आमने-सामने तर शिवसेना उबाठा पक्ष स्वबळाच्या तयारीत

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ नगर परिषदेची स्थापना होऊन नऊ वर्षाचा कालावधी उलटला तरीही सर्वपक्षीय एकोपा तर दूरच मात्र विकास निधी आणि कामे कोणी आणली? कोणी केली? कशी केली? कुठे केली? यावरून सुरू असलेले हेवेदावे निवडणुकीची आचारसंहिता सुरू होण्याची वेळ आली तरीही कमी होत नाहीये. मात्र नगरपरिषदेची निवडणूक कोणकोणत्या पक्षात आणि कोणकोणत्या गटात होणार आहे याबाबतच्या ध्रुवीकरणाला गतीने प्रारंभ झाला आहे. विधानसभा निवडणुकीत एकत्र असलेले शिवसेना राष्ट्रवादी शिंदे सेना यामधील तिन्हीही गट एकमेकापासून सुरक्षित अंतरावर गेले आहेत. त्यामुळे या गटात पुन्हा एकी होऊन हा गट नव्याने राष्ट्रवादीतून भाजपमध्ये गेलेल्या राजन पाटील यांना कशी टक्कर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.










ज्येष्ठ शिवसेना नेते दिपक गायकवाड यांनी आ.राजू खरे यांच्या विशिष्ट पक्षाच्या आणि विशिष्ट नेत्यांच्या बंगल्यावरच्या जनता दरबाराला जाहीर भाषणातून आक्षेप घेत तीव्र स्वरूपाची व्यक्त केलेली नाराजी बरेच काही सांगून जात आहे. वास्तविक पाहता मोहोळ संघर्ष समितीची संकल्पना ही तशी मूळ दीपक गायकवाड यांचीच होती. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊनच सर्वजण एका झेंड्याखाली एकत्र आले. विशेष म्हणजे हाच बंडाचा झेंडा पुढे विधानसभेला इतका मोठा झाला की त्याची परिणीती तत्कालीन राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते राजन पाटील आणि त्यांचे उमेदवार असलेले तत्कालीन आमदार यशवंत माने यांच्या पराभवाला कारणीभूत ठरली. ज्या मोहोळ नगरपरिषद हद्दीतील मतदारांनी लोकसभेला आणि विधानसभेला असा सलग दोन वेळा चमत्कार केला आता तेच मतदार नगर परिषदेला काय चमत्कार करणार ?हे पाहणे देखील औत्सुक्याचे ठरणार आहे. सध्या देशात भाजपा राज्यात भाजपा महायुती मग मोहोळ नगर परिषदेला महाविकास आघाडीच्या ताब्यात सत्ता देऊन मतदार काय साध्य करणार ? याबाबत ही मोठे कोडेच मानले जात आहे. मात्र तरीही विरोधासाठी विरोध न करता तात्विक मुद्द्यावर एकमेकांशी संलग्न असलेली शिवसेना हा सर्वात जास्त शक्तिशाली पक्ष म्हणून शहरात ओळखली जातो. शिवसेनेने स्थानिक अस्मिता आणि मोहोळच्या सर्वांगीण विकासामधील पारदर्शकता या मुद्द्यांना महत्त्व देत दीपक गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एकवटणे सुरू केले आहे. काहीजण अधून मधून कधी शिंदे सेनेच्या पालावर असतात तर कधी दीपक गायकवाड यांच्याबरोबर चर्चा करताना दिसून येतात. त्यामुळे अशी काठावरची मंडळी ऐनवेळी दीपक गायकवाड स्वतःसोबत घेणार की विरोधकांच्या तंबूत विश्वासार्हता अभावी परत पाठवणार हे देखील महत्त्वाचे आहे.

चारच दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचा अभेद्य बालेकिल्ला शाबूत ठेवणारे मात्र विधानसभेला पराभवाला सामोरे गेलेले राजन पाटील यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह आणि पदाधिकाऱ्यांसमवेत भाजपामध्ये प्रवेश करत जय श्रीराम घोषणा अंगीकारली. त्यामुळे आता यापूर्वीच्या जुन्या भाजपाला आता पुन्हा आणखी एका नव्या भाजपाच्या नेतृत्वाखाली काम करावे लागेल. त्यामुळे दरवेळी निवडणुकीची यंत्रणा कार्यकर्त्यांना वितरित करण्याच्या ऐवजी स्वतःचं चांगभलं करून घेणाऱ्या नेत्यांना मोठा धक्का मानला जात आहे. त्यामुळे जुन्या आणि यापूर्वीच्या नव्या अशा दोन्ही गटात काहीसे बैचनेचे वातावरण आहे.

मोहोळचे विद्यमान आमदार राजू खरे यांना सर्वाधिक मतदान हे मोहोळ शहरातून झाले आहे. त्यामुळे आ.राजू खरे हे स्वतंत्र पॅनल निर्मिती करणार की तटस्थ राहणार याबाबत अनेकांना शंकाच आहे. मात्र जर राजू खरे यांनी शिंदे सोबत जाणे पसंत केले आणि त्यांच्या कमी जागा निवडून आल्या तर विद्यमान आमदारांना मोठ्या राजकीय नामूश्कीला सामोरे जावे लागु शकते लागते.मोहोळ नगर परिषदेच्या भाजप उमेदवारी वाटपाची सर्व सूत्रे आणि निवडणुकीची सर्व यंत्रणा ही राजन पाटील यांच्याच हातात एकवटणार आहेत. त्यामुळे एकीकडे राजन पाटील आणि दुसरीकडे दिपक गायकवाड हे दोन ज्येष्ठ नेते एकमेकांच्या विरोधात पॅनल निर्मिती करून उभे ठाकणार असले तरी तिसरा गट नक्की किती जागा निवडून आणतो ?याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र मत विभागणीचा फायदा तिसऱ्या गटाला होऊ नये यासाठी दोन ज्येष्ठ मातब्बर नेते नेमकी काय काय भूमिका आणि व्युहरचना लावणार याकडे सर्वांचे लक्ष लागले.

# प्रभाग नऊ मधून पुनम प्रवीण (नाना) डोके निवडणूक लढवण्याचे निश्चित



## कोणत्या पक्षाकडून लढणार की अपक्ष होऊन आव्हान देणार ? याकडे संपूर्ण शहराचे लक्ष

## या प्रभागातुन वीस वर्षानंतर डोके वस्तीला हवंय नगरपरिषदेत प्रतिनिधित्व

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा असलेल्या आणि यापूर्वी प्रभाग क्रमांक चौदा आणि पंधरा या दोन जुन्या प्रभागांचा समावेश असलेल्या नव्या प्रभाग नऊ मधून निवडणूक लढवण्यासाठी अनेक इच्छुक आता कामाला लागले आहेत. सर्वसाधारण महिला आणि ओबीसी पुरुष असे या प्रभागाचे आरक्षण सोडत आहे. अडीचशे पेक्षा जास्त मतदार संख्या असलेल्या डोके, शेख वस्तीचा समावेश याच प्रभाग क्रमांक नऊ मध्ये आहे. आणि डोके वस्तीचा उमेदवार प्रभाग प्रतिनिधी म्हणून सर्वसाधारण महिला प्रवर्गातून मोहोळ शहरातील प्रतिथयश उद्योजक प्रवीणनाना डोके यांच्या सुविद्य पत्नी पूनमताई डोके यांचे नाव आता निवडणूक लढविण्याच्या यादीत झपाट्याने पुढे आले आहे. यापूर्वी अनेक दिग्गजांची नावे या प्रभागातून उमेदवारी मिळवण्याच्या स्पर्धेत असताना पूनम डोके या नावामुळे या प्रभागातूनच काय मात्र संपूर्ण शहरातून राजकीय समीकरणे गतिमान होताना दिसत आहेत.

यापूर्वी ग्रामपंचायत असताना वीस वर्षांपूर्वी अभ्यासू ग्रामपंचायत सदस्य सुधाकर अण्णा डोके हे निवडणूक लढवून विजयी होऊन त्यांनी याच डोके वस्तीचे याच प्रभागातून मोहोळ ग्रामपंचायतमध्ये प्रतिनिधित्व केले. त्यानंतर वीस वर्षानंतरही या प्रभागातून कोणत्याही डोकेना संधी मिळू शकली नाही. त्यामुळे आता डोके वस्तीसह या प्रभागाच्या पश्चिम भागातील अनेक वस्त्यांमधून पूनम डोके यांनी उमेदवारी घेऊन अथवा अपक्षपणे निवडणूक लढवावी अशी भूमिका प्रकर्षाने पुढे येत आहे. पुनम डोके या उच्चशिक्षित आणि अभ्यासु उमेदवार आहेत. याबाबत त्यांचे पती प्रवीणनाना डोके यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी वेट अँड वॉचच्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे आता पूनम डोके कोणत्या पक्षाकडे उमेदवारी मागणार की अपक्षपणे निवडणूक लढवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर शहरातील दिग्गज पक्षांनी त्यांच्या उमेदवारीबाबत निर्णय न घेतल्यास प्रवीण नाना डोके हे निश्चितपणे अपक्षपणे आपल्या सुविद्य पत्नींना या निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची चिन्हे आतापासूनच दिसू लागली आहेत.

पुनम डोके यांचे पती प्रवीण नाना डोके हे मोहोळ चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष असून सामाजिक कार्यात त्यांचा मोठा सहभाग असतो नुकत्याच पार पडलेल्या सीना नदीच्या पूरग्रस्त परिस्थितीमध्ये त्यांनी सर्वाधिक मदत कार्य राबवत गतिमान कार्य शैलीने नदीकाठच्या भागातील लोकांना जीवनावश्यक वस्तू पोहोच करत मोठा दिलासा दिला आहे. त्यामुळे प्रवीण नाना डोके यांचा विशेष सन्मान कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी केला. गेल्या अनेक दशकापासून सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या या परिवारातील प्रतिनिधी असलेल्या पूनम डोके यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागातील वातावरण चांगलेच ढवळून निघणार आहे.

प्रवीण डोके आणि पूनम डोके या डोके दाम्पत्याचा विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात उस्फूर्तपणे सहभाग असतो. नाना डोके यांचा समर्थ नगर, क्रांतीनगर, नाईकवाडी वस्ती, फडतरे वस्ती, डोके वस्ती त्याचबरोबर न्यू समर्थ नगर विश्वनाथ नगर या भागातही बॅटरी आणि वाहन विषयक व्यवसायाच्या निमित्ताने मोठा जनसंपर्क आहे. आणि प्रत्येक गरजूला सातत्याने मदत करण्याची भूमिका घेणारे नाना डोके हे निस्वार्थी आणि निरपेक्ष वृत्तीने कार्यरत असलेले सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांच्या परिवारातील सदस्याला उमेदवारी मिळावी अशी त्यांच्या समर्थकांची भावना असणे साहजिक आहे. त्यामुळे आता पूनम डोके यांच्या निवडणुकीत उतरण्याच्या पूर्वतयारीमुळे या प्रभागातील पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रभाग 10 मधून मेजर तानाजी माने यांच्याच उमेदवारीच्या शक्यतांना मिळतेय बळ

## माने परिवाराच्या निष्ठेची पोचपावती लोकनेते परिवार देणार

### अनगरकर -पाटील आणि क्षीरसागर परिवाराच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** एकेकाळी भाजपचा बालेकिल्ला असलेल्या प्रभाग क्रमांक १६ आणि १७ या दोन जुन्या प्रभागांचा मिळून झालेल्या प्रभाग क्रमांक दहा मध्ये राजकीय वातावरण निर्मितीला आता चांगलाच जोर आला आहे. या प्रभागातून खुल्या प्रवगार्तून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले मेजर तानाजी माने यांच्या समर्थकांनी डोअर टू डोअर मतदारांचा जनसंपर्क चांगलाच वाढवला आहे. शिवाय या प्रभागातील लोकनेते परिवाराचे निष्ठावंत समर्थक अनगर येथे जाऊन मेजर तानाजी माने यांनाच उमेदवारी द्यावी अशी मागणी करत आहेत. गेल्या अनेक वषार्पासूनच्या निष्ठेला पक्षश्रेष्ठी राजन पाटील नक्कीच न्याय देतील अशी भावना माने परिवार आणि माने समर्थकांची आहे.



गेल्या दोन दशकापासून माने परिवार राजन पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेला परिवार आहे. दुग्ध व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचा केवळ या प्रभागातच नाही तर आजूबाजूच्या दोन ते तीन प्रभागात देखील तानाजी माने यांचे सुपुत्र डॉ. किरण माने यांचा मोठा जनसंपर्क आहे. या परिवाराची वेळोवेळी सर्वसामान्यांच्या मदतीला जाऊन जाण्याच्या भूमिकेमुळे हा परिवार या प्रभागातील सर्वाधिक लोकप्रिय आणि जिव्हाळ्याचा परिवार म्हणून ओळखला जातो. शिवाय सार्वजनिक सोयी सुविधांसाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या या परिवाराचे आणि या प्रभागाचे कुटुंब प्रमुख असलेल्या मेजर तानाजी माने यांनाच खुल्या प्रवगार्तून संधी मिळावी अशी प्रभागातील हजारो नागरिकांची भावना आहे.

मेजर तानाजी माने आणि त्यांचे सुपुत्र डॉक्टर किरण माने यांनी विविध सांस्कृतिक उपक्रमातूनही माने परिवाराचा या प्रभागावर ठसा उमटवला आहे. त्यामुळे आता पक्षश्रेष्ठी राजन पाटील यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रभाग क्रमांक दहा मधील वाडीवस्त्यावरील सर्व स्तरातील नागरिकांच्या सुखदुःखात सहभागी होण्याची माने परिवाराची आजवरची भूमिका निश्चितपणे कौतुकास्पद आहे. दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शेकडो युवकांच्या हाताला काम देणारे मेजर तानाजी माने आणि त्यांची सुपुत्र किरण माने यांचे कार्य निश्चितपणे संपूर्ण शहर परिसरात प्रेरणादायी बाब म्हणावी लागेल. गत आठवड्यात दिवाळी निमित्त सर्वोत्कृष्ट दूध संकलन करणाऱ्या दूध उत्पादकांच्या सन्मान सोहळ्याला आवर्जून राजन पाटील यांनी उपस्थिती लावत या परिवाराला असलेली साथ आणि निष्ठेची सोबत सदैव कायम असल्याचे अधोरेखित केले. त्यामुळे मेजर तानाजी माने यांच्या उमेदवारीला या प्रभागातून ते निश्चितपणे हिरवा कंदील देतील अशी अपेक्षा लोकनेते परिवाराच्या समर्थकांना आणि मेजर तानाजी माने यांच्या कार्यकर्त्यांना आहे.

# इलेक्टिव्ह मेरीट असलेले जिब्राईल शेखच नगरसेवकपदाचे प्रबळ दावेदार

## प्रभाग आठ मधील वातावरण तापले

**मोहोळ (साहील शेख):-** सध्या महत्वाचा असलेला प्रभाग क्र आठ खेचून घेण्यासाठी सर्वच पक्षा मधून मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू आहेत. त्यामुळे सर्वच पक्षांनी या प्रभागातून जनाधार असलेला उमेदवार शोधण्यासाठी राजकीय चाचपणी सुरू केली आहे. दरम्यान या प्रभागातील सर्वात जास्त चर्चेत असलेले आणि सध्या कोणत्याही पक्षात नसलेले उदयोन्मुख युवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते जिब्राईल भाई शेख यांचे नाव प्रबळ नगरसेवक पदाच्या उमेदवारीबाबत आघाडीवर आहे. गेल्या अनेक वर्षापासून प्रभागात सह शहरातील शेकडो युवकांमध्ये सामाजिक कायार्ची आवड निर्माण करून प्रचंड जनसंपर्काची अफाट क्रेझ निर्माण केलेले शिवाय इलेक्टिव्ह मेरीट असलेले एकमेव उमेदवार जिब्राईलभाई शेख हे कोणती भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रभागातील सर्वसामान्य नागरिक आणि सहकारी कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच पुढील राजकारणाची दिशा आणि निवडणुकीचे धोरण ठरणार असल्याची माहिती जिब्राईलभाई शेख यांनी दैनिक कटूसत्यशी बोलताना दिली.



प्रभाग क्रमांक आठ हा शिवसेनेचा बालेकिल्ला ठरला आहे. त्याचबरोबर निधी खेचून आणण्यातबाबत उदासीनपणामुळे हा प्रभाग सोयीसुविधांपासून वंचित राहिला आहे. शहरातील अनेक प्रमुख रस्ते दुरुस्ती पासून वंचित आहेत. त्यामध्ये प्रभाग क्रमांक आठ मधील अनेक रस्ते आहेत. त्यामुळे या प्रभागातील जनतेला लोकाभिमुख आणि प्रशासनाभिमुख भक्कम संपर्क यंत्रणा असलेला सक्षम आणि विकास कामाचा पाठपुरावा अविश्रांतपणे करणाऱ्या दक्ष नगरसेवकांची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक आठ मधून सुप्तावस्थेत अनेकजण उमेदवारी घेऊन निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. मात्र तरीही या प्रभागात जनाधार असलेला आणि कोणत्याही पक्षाकडून उमेदवारी घेतली तरी निश्चितपणे विजयी होणारा उमेदवार म्हणून शेख यांच्याकडे पाहिले जात आहे. त्यामुळे आता जिब्राईलभाई शेख हे कोणत्या या पक्षाकडून निवडणूक लढवणार याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

जिब्राईल भाई शेख यांचे प्रभागातील व शहरातील अनेक समाज घटकांशी अत्यंत चांगले संबंध आहेत. शिवाय प्रशासनाचाही त्यांचा सातत्याने सामाजिक कायार्मुळे संपर्क येत असल्यामुळे अल्पावधीतच एक लोकप्रिय आणि राजकारणातील आश्वासक चेहरा म्हणून त्यांचे कार्य चर्चेत आले आहे. त्यामुळे कोणत्याही दिग्गज पक्षाला जिब्राईलभाई शेख यांची उमेदवारी जमेची बाब ठरू शकते. त्यामुळे जिब्राईलभाई यांनाच उमेदवारी देण्यासाठी शहरातील चाणाक्ष पक्षश्रेष्ठींनी इतर कार्यकर्त्यांशी चर्चा आणि राजकीय चाचपणी सुरू केल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्यामुळे प्रभाग क्रमांक आठ मधून जिब्राईलभाई शेख हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवून विजयी नगरसेवक ठरणार याकडे प्रभागातील त्यांच्या समर्थकांचे लक्ष लागले आहे.

# मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबर स्थानिक अस्मिता जपण्याचे राजकारण व्हावे



## गेम चेंजर व्यक्तिमत्व तथा ज्येष्ठ नेते पद्माकर आप्पा देशमुख यांचे महत्वपूर्ण मत

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक दशकापासून आपली सिद्ध नागेश यांची जागृत नगरी मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे, सर्वांनी एकत्र रहावे ही माझी सातत्याने भूमिका आहे. ज्या ज्या वेळी मोहोळ शहराच्या अस्मितेचा आणि स्थानिक महत्त्वाच्या मुद्द्यांचा विषय पुढे आला त्या त्या वेळी मोहोळ शहराने अभुतपूर्व एकी दाखवली. गत लोकसभेला आणि विधानसभेला याच एकीने परिवर्तन घडवले. त्यामुळे आजवर प्रस्थापित राजकीय एकाधिकारशाहीला छेद देत विजयश्री खेचून आणत शहरावर भगवा केवळ फडकवलाच नाही तर अनेक वर्ष तो अबाधित ठेवला आहे.

मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबर स्थानिक अस्मिता जपण्याचे राजकारण व्हावे अशी महत्वपूर्ण भूमिका आणि महत्वपुर्ण मत गेम चेंजर व्यक्तिमत्व तथा ज्येष्ठ नेते पद्माकरआप्पा देशमुख यांनी नोंदवले.

मोहोळ शहरातील सर्वसामान्य जनतेने आजपर्यंत धर्म, जात, पक्ष, चिन्ह या बाबीवर मतभेद आणि मनभेद मनात न आणता केवळ आपल्या मोहोळ शहराची स्थानिक अस्मितेला प्राधान्य देत राजकारणामध्ये चमत्कार घडवले आहेत. मोहोळ शहर हे सर्वकष राजकारणामध्ये सक्रिय असलेले क्रांतिकारी आणि पुरोगामी विचारांचे शहर आहे आहे. भले पक्ष प्रवाह आणि गटातटाच्या माध्यमातून एकमेकांबद्दल क्षणिक कटुता निर्माण झाली असली तरी निश्चितपणे येत्या काळात सवार्नी एकत्र होऊन मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे असे महत्वपूर्ण मत मोहोळचे ज्येष्ठ नेते पद्माकर आप्पा देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यापूर्वी ग्रामपंचायतीच्या सत्ता स्थापनेच्या वेळी आपण पुढाकार घेऊन शहरातील समविचारी मंडळी सोबत राहून तत्कालीन राष्ट्रवादीच्या दिग्गज आणि ज्येष्ठ नेत्यांना ग्रामपंचायतीच्या सत्तेपासून दूर ठेवत या शहरावर भगवा फडकवण्यासाठी गेम चेंजर होण्याची भूमिका पार पाडत मोहोळच्या अस्मितेसाठी जीवाचे रान केले होते.आता देखील मोहोळ शहराच्या सत्तेच्या आणि विकासाच्या चाव्या आपल्या सर्वांच्या मोहोळ शहराची स्थानीक अस्मिता जपणारे नगरसेवक आणि स्थानिक सर्वसामान्य जनतेच्या हातात राहाव्या असे माझे प्रामाणिक मत आहे. क्षणिक कटूतेमुळे याचा मोठा फायदा हा विरोधकांनाच होणार आहे. त्यामुळे सर्वांनी केवळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निरपेक्ष भावनेने राजकारणात सक्रिय रहावे अशी माझी भूमिका यापूवीर्ही होती आणि यापुढेही राहील.

**- पद्माकर आप्पा देशमुख,** जेष्ठ मार्गदर्शक

## संपादकीय

# विकासाचे व्हिजन

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये महाराष्ट्राच्या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता देण्यात आली. 2047 पर्यंत म्हणजे भारतीय स्वातंत्र्याला 100 वर्षे पूर्ण होईपर्यंत महाराष्ट्राला संपूर्ण विकसित राज्य बनवण्याच्या दृष्टिकोनातून हे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे. केंद्रीय पातळीवर नरेंद्र मोदी सरकारने देशाला सर्वात विकसित देश करण्याच्या दृष्टिकोनातून जे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे, त्याच आधारे महाराष्ट्रासाठीसुद्धा या व्हिजन डॉक्युमेंटला मान्यता देण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांच्या कालावधीमध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या सूचना मागवून त्या आधारे हे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे.

पुढील 20-25 वर्षांमध्ये राज्याचा विकास कशा पद्धतीने करावयाचा याचा विचार या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये केला असतानाच सध्याच्या कालावधीमध्ये राज्यातील परिस्थितीसुद्धा ठळकपणे उठून दिसत आहे. एकीकडे अवकाळी आणि अतिरिक्त पावसामुळे बळीराजा पूर्णपणे कोलमडून गेला आहे. अनेक ठिकाणी आंदोलने सुरू असूनही शेतकरी आणि शेतकरी संघटना यांचे समाधान होईल अशा प्रकारे कोणताही निर्णय राज्य सरकारला घेता येत नाहीये. विविध प्रकारच्या सामाजिक आंदोलनांमुळे सुद्धा वातावरण ढवळून निघाले आहे.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आले आहे. अर्थात, भारतातील किंवा महाराष्ट्रातील कोणत्याही योजनेप्रमाणे हे व्हिजन डॉक्युमेंटसुद्धा अत्यंत आदर्श असेच आहे. विविध प्रकारचे 16 विषय या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये घेण्यात आले असून त्या आधारे विविध 100 उपक्रम येत्या 20 वर्षांच्या कालावधीमध्ये राबवून 1947 पर्यंत महाराष्ट्राला आणि पर्यायाने देशाला संपूर्णपणे विकसित करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवण्यात आले आहे. 2029 पर्यंत पहिला टप्पा, 2036 पर्यंत दुसरा टप्पा आणि 2047 पर्यंत तिसरा टप्पा अशाप्रकारे क्रमशः हा विकास प्रत्यक्षात आणण्याचे व्हिजन राज्य सरकारने समोर ठेवले आहे आणि त्यासाठी सरकारने शाश्वत, सर्वसमावेशक सुशासन आणि प्रगतिशील असे चार प्रकारही विभागले आहेत.

म्हणजेच आगामी कालावधीमध्ये राज्याचा विकास करत असताना तो प्रगतिशील पद्धतीने, शाश्वत पद्धतीने, सर्वसमावेशक पद्धतीने करत असतानाच सुशासन आणि प्रशासन यामध्ये सुद्धा नागरिकांना हवी ती सुधारणा होईल अशी अपेक्षा या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये तळागाळातील नागरिकांनी दिलेल्या सूचनांच्या आधारे हे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यात आल्याने त्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटले असेल अशी अपेक्षा करायला हरकत नाही. पण प्रत्यक्षपणे डॉक्युमेंट अंमलात आणताना मात्र अनेक अडचणी येतात आणि अशा प्रकारची आदर्श डॉक्युमेंट 100 टक्के अमलात येत नाहीत असाच आजपर्यंतचा अनुभव आहे.

राज्य सरकारने या डॉक्युमेंटच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी युनिट्स तयार करण्याचा निर्णय घेतला आहे आणि टप्प्याटप्प्याने विकास करण्याचा हेतू समोर ठेवल्यामुळे अंमलबजावणी पातळीवर जास्त अडचणी येणार नाहीत. अर्थात, येत्या 20-22 वर्षातील विकासाचे चित्र नागरिकांसमोर ठेवत असताना सरकारला विद्यमान परिस्थितीकडेसुद्धा दुर्लक्ष करून चालणार नाही. आगामी 20-22 वर्षातील विकास हा वर्तमानकालीन परिस्थितीवरच अवलंबून राहणार आहे. अर्थशास्त्रीय नियमाप्रमाणे जरी दीर्घकालीन विकासाचे उद्दिष्ट ठेवणे बरोबर असले तरी आणि हा दीर्घकालीन विकास विविध टप्प्यामध्ये विभाजित करून टप्प्याटप्प्याने राज्याचा विकास करणेसुद्धा योग्य असले तरी सध्या राज्य सरकारच्या समोर असलेल्या विविध समस्यांचा निपटाराही करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

डॉक्युमेंटच्या निमित्ताने भविष्यातील विकासाचा वेध घेण्यात आला असला, तरी त्याचवेळी वर्तमानातील परिस्थितीही सुधारणे अत्यंत आवश्यक आहे.राज्य सरकारच्या या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचे घटक तयार करण्यात आले आहेत. साहजिकच हा शाश्वतपणा आणि सर्वसमावेशकपणा वर्तमान काळापासूनच अमलात आणणे गरजेचे आहे. 20-22 वषार्तील विकासाचा पाया भक्कम करावयाचा असेल आणि व्हिजन डॉक्युमेंट खंया अर्थाने परिपूर्णपणे अमलात आणायचे असेल तर त्याचा विचार वर्तमानापासूनच करावा लागणार आहे.

केवळ व्हिजन डॉक्युमेंटसारख्या एखाद्या योजनेच्या माध्यमातून दिखाऊ विकासाचे चित्र उभे करण्यापेक्षाही राज्यातील जनतेला आश्वासक वाटेल अशी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती निर्माण करणे जास्त महत्त्वाचे आहे. तरीसुद्धा सरकारने आगामी कालावधीतील विकासाचा विचार करून व्हिजन डॉक्युमेंटची मांडणी करून त्याची नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्याचा विचार केला आहे हेसुद्धा काही कमी नाही.

# निसर्गाची लहरीपणा

माणसांप्रमाणे निसर्ग देखील बदलला आहे असे वाक्य हल्ली सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळते आणि ते खरेही आहे कारण सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढत चालला आहे. निसर्गाच्या लहरीपणाचा अभ्यास करणारे हवामान खातेही निसर्गापुढे हतबल ठरत आहे कारण हवामानासंबंधीचा अंदाज बांधणे त्यांनाही कठीण होत आहे. पुर्वी ज्याप्रमाणे हवामान होते तसे हवामान आता राहिले नाही. सध्या सतत हवामान बदलत असते. निसगार्चा लहरीपणा वाढला आहे. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा या तीन ऋतूत जसे हवामान होते तसे आता राहिले नाही. जून ते सप्टेंबर हे चार महिने पावसाचे असतात मात्र गेल्या काही वर्षात आपल्या देशात वर्षभर पाऊस पडतो असे म्हटले तर वावगे ठरणार नाही कारण वर्षभर कोठेना कोठे अवकाळी पाऊस, गारा तसेच चक्रीवादळे होतच असतात. आताही पहा ना नोव्हेंबर महिना सुरू झाला तरी पावसाने विश्रांती घेतली नाही. नोव्हेंबर महिन्यातही राज्यातील अनेक भागात पाऊस सुरू आहे. आंध्रप्रदेश आणि ओडिशाच्या समुद्र किनाऱ्यावर मोंथा नावाचे चक्रीवादळ धडकले आहे. या चक्रीवादळाने राज्यातच नाही तर देशात मुसळधार पावसाचा अदाज वर्तवला जात आहे. सहा महिने झाले तरी पाऊस थांबायचे नाव घेत नाही. पावसाळाच नाही तर उन्हाळा आणि हिवाळ्याचीही तीच गत आहे. उन्हाळ्यात तर तापमान ४० अंशाच्या पुढे जाते पूर्वी उन्हाळ्यात सरासरी तापमान ३५ ते ३८ अंशाच्या दरम्यान असायचे ते आता ४० अंशावर गेले आहेत. अलीकडे ऋतुमान बदलत आहे कोणत्याच ऋतूची सुरवात वेळेवर होत नाही उन्हाळा, पावसाळा, हिवाळा असे तिन्ही ऋतू उशिराच सुरू होतात. आता हेच पहा नोव्हेंबर महिन्यात पूर्वी कडाक्याची थंडी पडत असे आता मात्र नोव्हेंबर महिना उजाडूनही थंडीचा साधा लवलेशही नाही. जून मध्ये येणारा पाऊस जुलै संपत आला तरी दडी मारतो आणि आला तर असा येतो की दोन दिवसात दोन दिवसांची सरासरी भरून काढतो. मात्र अशाप्रकारच्या पावसाची आपल्याला गरज नसते कारण या पावसाने आपले नुकसानच होते. निसर्गाच्या या अवकृपेचे संकट केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगावर आले आहे. अर्थात या बदलत्या हवामानाला आणि निसर्गाच्या लहरीपणास ग्लोबल वॉर्मिंगला जबाबदार धरले जात आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ. जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंगची समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची समस्या दिवसेंदिवस वाढत जाईल असा इशारा जागतिक हवामान खात्याने दिला आहे त्यामुळे यापुढे हवामानात बदल हे होतच राहणार आणि त्यामुळे निसर्गाचा लहिरपणा देखील वाढणार आणि तीच चिंतेची बाब आहे अर्थात हवामानातील बदल आणि त्यामुळे होणारी निसगार्ची अवकृपा ही केवळ ग्लोबल वॉर्मिंगमुळे होत आहे असे म्हणणे म्हणजे स्वतःच्या चुकीवर पांघरून घालण्यासारखे आहे. निसगार्तील बदलाला जितके ग्लोबल वॉर्मिंग जबाबदार आहेत तितकेच आपण म्हणजे मानव देखील जबाबदार आहोत. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभारली. बेसुमार वृक्षतोड केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन केले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. निसर्गावर अतिक्रमण करून निसर्गावर अन्याय केला. नदी नाल्यांचा मार्ग बदलला. या सर्व कारणांमुळे पृथ्वीवरील हवामान बदलत आहे. सजीवांना विशेषतः मानवाला जगण्यासाठी प्राणवायूची गरज असते. मात्र मानवाच्या चुकांमुळे स्वाथार्मुळे हवेत घातक रसायनांचे आणि प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सतत होणाऱ्या जंगलतोडीमुळे जंगलाखालील एकूण क्षेत्र २० टक्क्यांपेक्षा खाली आले आहे त्याचा मोठा परिणाम हवामान बदलावर झाला आहे. हवामान बदलामुळे निसर्गाचा लहरीपणा वाढला आणि निसर्गाने आपल्यावर अवकृपा करण्यास सुरवात केली. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतातील ७० टक्के नागरिक शेती आणि त्याला पूरक असणारे व्यवसाय करतात. निसर्गाच्या लहिरपणाचा सर्वाधिक फटका हा शेतकऱ्यांना बसत आहे. बदलत्या हवामानमुळे कोरडा दुष्काळ, ओला दुष्काळ, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्री वादळे अशा नैसर्गिक आपत्तींना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. यामुळे अनेकांनी शेती करणेच बंद केले आहे तरुण वगार्ने गाव सोडून थेट शहर गाठले आहे. परिणामी गावे ओसाड होत आहे तर शहरांची लोकसंख्या वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर देखील होत आहे. हवामान बदलामुळे श्वसनाचे आणि इतरही आजार वाढत आहे. निसर्गाचा लहरीपणाचा परिणाम केवळ मानवावरच नाही तर पशु पक्षी आणि सजीवांवर देखील होत आहे एकूणच निसर्गाच्या लहरीपणाचा परिणाम संपूर्ण जीवसृष्टीवरच होत आहे. निसर्गाची जर अशीच अवकृपा राहिली तर त्याचा परिणाम केवळ आपल्यालाच नाही तर येणाऱ्या पिढीला देखील भोगावा लागेल म्हणून या बदलत्या हवामानाची आणि त्यामुळे होणाऱ्या निसर्गाच्या अवकृपेची मानवाने गंभीर दखल घ्यायला हवी. हवामान बदलामुळे होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन मानवाने आतापासूनच सकारात्मक पावले उचलायला हवीत. निसर्गाच्या या अवकृपेच्या संकटाकडे जर मानवाने दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याची मोठी किंमत केवळ आपल्यालाच नाही तर संपुर्ण जीवसृष्टीला चुकवावी लागेल.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# भक्ती करा सावधान राहून!

*वदनी कवळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे*
*सहज हवन होते, नाम घेता फुकाचे*
*जीवन करी जीवित्वा, अन्न हे पूर्णब्रह्म*
*उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म-*

हा श्लोक सार्वजनिक भोजनात अनेकांनी ऐकला असेल. जेवणे म्हणजे यज्ञ करणे, अन्न म्हणजे ब्रह्मयाचा साक्षात्कार घडणं, तोंडात घास घालणं म्हणजे हवन आणि जेवणाचा प्रारंभ हरी- हरी म्हणत नामस्मरणाने करणं, असा या श्लोकाचा आध्यात्मिक अर्थ आहे. अध्यात्माचे जंतू जेवणावळीतही फार मोठ्या संख्येने आढळावेत, याचं निदान आपल्या देशात तरी आश्चर्य वाटायला नको. कारण आपला देश प्राचीन, थोर संस्कृती लाभलेला आहे ना!

आधीच आपण आध्यात्मिकतेने वेडे झालेले आहोत. त्यात गरिबीमुळे फुकट काही खायला मिळते का हे पाहाण्याचं वेड. प्रसाद, महाप्रसाद या नावाने जन्माष्टमी, रामनवमी, मंदिरातील सणवार, उत्सव, पालखी सोहळा, नवरात्र यानिमित्ताने दिला जाणारा प्रसाद, महाप्रसाद अगर भंडारा जेवणरूपात असतो, वर्गणी न देणाऱ्यांनाही तो घेता येत असल्याने श्रद्धाळू (वर्गणी-देणगी देणारे) आणि परिसरातील सर्व गरीबगुरीब, भिकारी (वर्गणी न देणारे) खूप गर्दी करीत नसतील तरच नवल! भाविकांना श्रद्धेने तर भिकाऱ्यांना भुकेने पछाडलेलं असल्याने उकड भात, पातळ आमटीचं पाणी आणि गव्हाची वीरं अगर सपक शिरा भराभर संपत असतो. असं हे यज्ञकर्म भाविकांना मोक्षप्राप्तीसाठी पुण्य देताना प्रत्यही आढळतं.

एखाद्-दुसरा चिकित्सक हे सारं लांबून पाहाणंच पसंत करतो. नसलेल्या देवासाठी प्रसादरूपी जेवण हे त्याला प्रथमतः पटत नाही. भाविक नसलेले कार्यकर्ते आणि त्यांचा स्वतःचा रुबाब वाढवण्यासाठी केलेला हा उपद्व्यापही पटत नाही. जेवण तयार करण्याच्या जागेपासून पिण्याच्या पाण्यापर्यंतची अस्वच्छता पटत नाही. अशा या बाजारूपणात उच्चशिक्षितांनी शिरावं हे पटत नाही. आणि आपण या सर्व अनिष्ट गोष्टी थांबवू शकत नाही, हेही पटत नाही. चिकित्सक मनाला व्यथा देणारा हा उपक्रम यज्ञकर्म कसा मानायचा? मग असं हे यज्ञकर्म निंदनीय नव्हे काय? मात्र एक गोष्ट त्याला मनापासून पटते. भुकलेल्याला अन्न हा खरा धर्म हे गाडगेबाबांचं वचन त्याला समाधान देतं. अंधारातील काजव्यासारखं.

मठ-मंदिरात आधी दर्शन, मग तीर्थ, मग प्रसाद नंतर महाप्रसाद हा क्रम सारेच श्रद्धाळू अवलंबतात. पण त्यातही काही श्क्ढ भक्त फक्त दर्शन घेतात. तीर्थ-प्रसाद-महाप्रसाद-भंडारा युक्तीने टाळतात; कारण ते स्वसामर्थ्याने, डोकेबाजपणाने, समाज आणि शासनाच्या अशक्त बाजूवर हल्ला करून श्क्ढ झालेले असतात. तीर्थ नावाचं पाणी आपल्याला बाधेल, प्रसादातून हिप्पॅटायटिस बी सारखे विकार उद्भवतील आणि महाप्रसादाने अमिबांना आपल्या पोटात जागा मिळेल, त्याने आपलं ऐशआरामी जीवन बिघडून जाईल याची त्यांना काळजी वाटत असते आणि ते खरंही असतं.

तिकडे मूर्ख भाविकांच्या वदनी कवळ घेता... या ओळी वातावरणात ध्वनिप्रदूषण करीत असतात आणि इकडे हे कुणी लब्धप्रतिष्ठित गालात हसत आपल्या महागड्या गाडीकडे जात असतात. ते देव-धर्म-भट-भाविक आणि त्यांच्या श्रद्धेचं व्यावहारिक मूल्य खट्याळपणे मोजत गाडीत बसून भुर्रकन निघून जातात. खरं तर, त्यांचंच वागणं बरोबर असावं. असे वर्तन करणारे देव-दैव- धर्मवाद्यांना नास्तिक पारखंडी, विक्षिप्त, असामाजिक (Antisocial) वाटत असतील, पण मूर्खांच्या समवेत किती राहायचं हे ठरवण्याचा त्यांचा अधिकार अबाधित असलाच पाहिजे. व्यक्तिगत बुद्धिनिष्ठा आणि आचरणाचा सुबुद्धपणा, चिकित्सावृत्ती ही विकासोन्मुख खरी संस्कृती आहे. विवेकानंदही म्हणतात, 'ईश्वराच्या पूजेसाठी एखादं मंदिर निर्माण करावयाचे असेल तर खुशाल करा...पण लक्षात असू द्या की, त्यापेक्षा अधिक चांगलं, श्रेष्ठ मंदिर आधीचंच अस्तित्वात आहे. ते म्हणजे मानवशरीर!' म्हणून जो आपल्या आरोग्याची काळजी घेतो तोच शहाणा. कारण- तीर्थ-प्रसादही। तपासुनी घ्यावे

संसर्गाचा धोका । जीव घेतो ॥१
फुकटचे अन्न । दूषित असते
विषबाधा होते। पुष्कळदा ॥२
महाप्रसादाने मेले। कितीतरी
देवाने माघारी । आणले का?॥३
जीवन हे नाही । देवाने दिलेले
देवामुळे मेले । मात्र खूप ॥४
अंधाचा विश्वास । असे अनाठायी
अकलेचा नाही। लेश तेथे ॥५
व्हावे चिकित्सक। देवाचे, धर्माचे,
वीर जीवनाचे । होण्यासाठी ॥६
डोळस होऊन । जगा जन्मभर
भार देवावर । मूर्ख ठेवी ॥७
भक्त जगतसे । डोळे झाकूनिया
जातसे तो वाया। ध्यानी घ्यावे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## राजवी अॅग्रोचा ऊसदरात वाढ - शेतकऱ्यांना ३००१ रुपये प्रतिटन दराची घोषणा

**माढा, (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्यातील आलेगाव (बुद्रुक) येथील राजवी अॅग्रो पॉवर प्रा. लि.या साखर कारखान्याने यंदाच्या गाळप हंगामासाठी ३००१ रुपये प्रति मेट्रिक टन ऊस दर जाहीर करत ऊस हंगामाचा उत्साहात शुभारंभ केला. कारखान्याचे चेअरमन प्रा. शिवाजीराव सावंत यांनी हा दर जाहीर करताना सांगितले की, 'राजवी अॅग्रो' सोलापूर जिल्ह्यातील ऊस दर जाहीर करणारा पहिला कारखाना ठरला आहे.

प्रा. सावंत म्हणाले की, 'भैरवनाथ शुगरचे विभाजन झाल्यानंतर हा कारखाना आता ह्यराजवी अॅग्रो प्रा. लि.' या नावाने सुरू झाला आहे. कारखाना सुरू होईल की नाही याबाबत शंका होती, परंतु व्हाईस चेअरमन पृथ्वीराज सावंत यांनी दोन महिन्यांच्या अथक परिश्रमानंतर हा कारखाना सुरू केला.'

मागील हंगामात कारखान्याने २८०० रुपये प्रतिटन दर दिला होता, तर यावर्षी दरात वाढ करून ३००१ रुपये दर देण्यात येणार आहे. ऊस गाळपास आल्यापासून१० ते १२ दिवसांत बिल देण्यात येईल. पहिला हप्ता २८०० रुपये, तर बैलपोळ्याला १०० रुपये आणि दिवाळीला १०१ रुपये असा दुसरा हप्ता दिला जाईल.

वाहतूकदारांसाठीही मोठा दिलासा देण्यात आला असून १ ते ३० किलोमीटरसाठी ३० किमी दर आणि २१ ते ४० किलोमीटरसाठी ४० किमी दर निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे वाहतूकदारांना आर्थिक फायदा होणार आहे.

या वेळी माजी उपसभापती बंडूनाना ढवळे म्हणाले, 'कोणतेही क्षेत्र असो, तालुका एकसंघ राहायला हवा. सावंत परिवाराच्या प्रयत्नांना आपला पाठिंबा राहील,' असे सांगत त्यांनी आगामी स्थानिक निवडणुकांतील समीकरणांचे सूतोवाच केले.या हंगामात कारखान्याकडे १५,००० हेक्टर नोंदणी असून साडेपाच लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजाभाऊ खटके (जनरल मॅनेजर, अॅग्री) यांनी केले. या प्रसंगी धनश्री पतसंस्थेचे चेअरमन शिवाजीराव काळुंगे, उपाध्यक्ष पृथ्वीराज सावंत, मुन्ना साठे, संजय पाटील-भीमानगरकर, बंडूनाना ढवळे यांची भाषणे झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. ए. पाटील यांनी केले व आभार अजिंक्य काटे यांनी मानले.

## अतिवृष्टीची नुकसानभरपाई, कर्जमाफी व ऊस दरवाढीची मागणी; शासनाला इशारा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी, कर्जबोजा आणि ऊस दरवाढ यांसारख्या गंभीर समस्यांनी ग्रासले असून शासनाकडून ठोस उपाययोजना न झाल्याने शेतकरी संघटना आणि संभाजी ब्रिगेड आक्रमक झाल्या आहेत.या मागण्यांसाठी आज बार्शी तहसील कार्यालयातच ठिय्या आंदोलन करण्यात आले.या आंदोलनाचे नेतृत्व शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष हणुमंत भोसले आणि संभाजी ब्रिगेडचे आनंद काशीद यांनी केले. तहसीलदार एफ. आर. शेख यांच्यासमोर शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला.



सप्टेंबर महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे बार्शी तालुक्यातील ऊस, सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, भाजीपाला व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाने मदत निधी मंजूर केला असला तरी अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा झालेली नाही,असा आरोप आंदोलकांनी केला.

'दि. ३० ऑक्टोबरपर्यंत निधी न मिळाल्यास तहसील कार्यालयाला टाळे ठोक आंदोलन करू,ह्व असा इशारा हणुमंत भोसले यांनी तहसीलदारांना दिला.शेतकरी संघटना आणि संभाजी ब्रिगेडने आंदोलनादरम्यान स्पष्ट मागणी केली की, 'राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज प्रचंड वाढले असून आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे सरसकट कर्जमाफी तात्काळ जाहीर करावी आणि ऊस दर किमान ४,००० रुपये प्रति टन निश्चित करावा.'

बार्शी तालुक्यातील इंडियन शुगर (तुर्कपिंपरी), इंद्रेश्वर शुगर (उपळाई ठोंगे) आणि येडेश्वरी शुगर (खामगाव) या कारखान्यांवर तालुक्यातील उसाऐवजी इतर तालुक्यांतील ऊस घेऊन अन्याय केल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला. 'स्थानिक शेतकऱ्यांच्या उसाला प्राधान्य न दिल्यास कारखान्यांसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल आणि गरज पडल्यास कारखाने बंद पाडू,' असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या ठिय्या आंदोलनात शेतकरी संघटना, संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आंदोलनादरम्यान प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी झाली.

तहसीलदार एफ. आर. शेख यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांचे निवेदन स्विकारले असून, 'वरिष्ठ पातळीवर मागण्या पाठवून तात्काळ कार्यवाहीसाठी प्रयत्न केले जातील,' असे आश्वासन दिले.

## सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे मार्गासाठी १६४७ कोटी मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर-तुळजापूर-धाराशिव या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाच्या सुधारित ३ हजार २९४ कोटींच्या खर्चास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच यातील राज्य सरकारच्या ५० टक्के हिश्श्यानुसार १६४७ कोटी रुपयांचा निधी देण्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.



यामुळे गेल्या पाच वर्षांपासून कागदावर असलेल्या या रेल्वे प्रकल्पाला गती मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत विविध खात्यांशी संबंधित सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यात सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे मार्गाच्या निधीला मान्यता देण्याचा महत्त्वाचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचे शक्तिपीठ रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर येणार आहे. यातून धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे. राज्य शासनाने मंजूर केलेला प्रस्ताव आता केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये याला अंतिम मंजुरी मिळणार आहे. प्रत्यक्षात गेल्या आठ महिन्यापूर्वी धाराशिव-तुळजापूर या ३० कि.मी. रेल्वे मार्गाच्या एक हजार कोटींच्या प्रकल्पाला मुहूर्त लागला. उर्वरित ५४ कि.मी. अंतराचा रेल्वे मार्ग, भूसंपादन, स्थानक उभारणी आदी कामांसाठीची एकत्रित निधीकरिता सोलापूर विभागाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्याला आज राज्य सरकारने मंजुरी दिली.

### २०१९ मध्ये मंजुरी, प्रत्यक्ष काम २०२५ मध्ये सुरू

धाराशिव - तुळजापूर - सोलापूर रेल्वे मागार्ला २०१९ मध्ये मंजुरी मिळाली. ८४ किमी अंतराच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २०१९ मध्ये भूमिपूजन झाले. पूर्वी हा प्रकल्प १ हजार कोटींच्या घरात होते. त्यानंतर आता वाढीव प्रचलित दरानुसार हा प्रकल्प ३ हजार २९४ कोटींच्या घरात गेले. यात राज्य शासनाचा ५० टक्के तर केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा असणार आहे. त्यानुसार राज्य शासनाने मंगळवारी या वाढीव निधीला मंजुरी दिली आहे.

### ही कामे होणार

धाराशिव येथे १२ हजार चौरस मीटरचे रेल्वे स्थानक, जलदगती रेल्वेमार्गासह यासाठी आवश्यक असणारी पर्याय व्यवस्था, मालगाडीसाठी आवश्यकतेनुसार मोठ्या लांबीची लूपलाइन, ३१ रस्त्यांच्या खालून रेल्वे मार्गासाठी पूल तयार केले जाणार आहेत. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील रेल्वे पूल, प्रवाशांसाठी अनेक महत्त्वपूर्ण सोयीसुविधा, पथमार्ग, दादरा, प्लॅटफॉर्म यासह रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी साधारणः ३५० निवासस्थाने आदी कामे या निधीमधून केली जाणार आहेत.

## सोलापूर महापालिका निवडणुकीत तब्बल 3 लाख मतदारांची वाढ - प्रशासन सज्ज

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर महापालिका निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. यंदा होणाऱ्या निवडणुकीत सुमारे अडीच ते तीन लाख नवीन मतदारांची वाढ झाल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदार याद्यांनुसारच आगामी महापालिका निवडणूक घेण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे** यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.



महापालिकेच्या मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदारसंख्येत मोठी वाढ झाली असून, यामुळे मतदान केंद्रांची आणि बूथची संख्या वाढवावी लागणार आहे. यासाठीचे नियोजन महापालिका प्रशासनाने सुरू केले आहे.

प्रा. ओंम्बासे म्हणाले, 'सध्या मतदार याद्यांचे व्हेरिफिकेशनचे काम युद्धपातळीवर सुरू असून, दि.६ नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी ऑनलाइन जाहीर केली जाईल. त्यानंतर हरकती आणि सूचना घेऊन निवडणूक आयोगाच्या निर्देर्शानुसार अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल.'

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार प्रभाग रचना प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता आरक्षण सोडत दि.११ नोव्हेंबर रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात करण्यात येणार आहे. त्यापूर्वी दि.४ नोव्हेंबरपर्यंत आरक्षण आणि संख्याबळाचा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर केला जाणार आहे.

मतदारसंख्या वाढली, सदस्यसंख्या तीच सन २०१७ च्या महापालिका निवडणुकीत एकूण मतदारसंख्या ६ लाख ७३ हजार इतकी होती. मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर झालेल्या नोंदणीमुळे ही संख्या आता सुमारे ९ लाख ५० हजारांवर पोहोचली आहे - म्हणजेच सुमारे अडीच ते तीन लाख नवीन मतदारांची भर. तथापि, महापालिकेतील सदस्यसंख्या १०२ इतकीच राहणार आहे.

महापालिका प्रशासनाने प्रत्येक प्रभागातील मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार मतदान केंद्रांवरील सुविधा, प्रवेशमार्ग, दिव्यांगांसाठी सुविधा, आणि सुरक्षा याबाबतचे नियोजन अंतिम टप्प्यात आहे. निवडणुकीसाठी सर्व विभाग सज्ज स्थितीत ठेवले जात आहेत.

## वात्रटिका

### अवकाळी येणे

पुरूषासारखी पावसाला
सुद्धा एक बायको पाहिजे...
वठणीवर आणण्यासाठी,
नि त्याचीही जिरली पाहिजे...
तिथी नाही मिथी नाही तो
अवकाळी बरसतो आहे...
निवडणुकीतील नेत्यावाणी
उगाचच गर्जतो आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# स्थानिक निवडणुकांसाठी महाविकास आघाडी सज्ज - कार्यकर्त्यांना एकजुटीचे आवाहन!




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची बैठक करकंब (ता. पंढरपूर) येथे आ. अभिजित पाटील, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत 'गरज असेल तेथे आघाडी, आणि बळ असेल तेथे स्वबळावर लढा' असा सूर सर्वच घटक पक्षांच्या नेत्यांकडून उमटला.

बैठकीस काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप धोत्रे, काँग्रेस निरीक्षक जावेद काझी आदी मान्यवर उपस्थित होते.

मनसेचे जिल्हाध्यक्ष दिलीप धोत्रे म्हणाले, 'सत्ताधाऱ्यांविषयी लोकांमध्ये असंतोष आहे. ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची असणार आहे. कार्यकर्त्यांनी जागरूक राहून व्होट चोरीचा मुद्दा घराघरात पोहोचवावा आणि १ नोव्हेंबरला मुंबईतील महामोर्चात सहभागी व्हावे.'

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी सांगितले की, 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत निष्ठावंत, पक्षनिष्ठ आणि प्रामाणिक कार्यकर्त्यांनाच तिकीट दिले जाईल. निवडून आल्यानंतर दगा देणाऱ्यांना स्थान नाही.' शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे म्हणाले, 'शिवसेनेने पूर्वीप्रमाणेच महाआघाडीच्या उमेदवारांच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करणार आहे.'

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांनी आवाहन केले की, "उमेदवार कोणत्याही घटक पक्षाचा असो, तो महाविकास आघाडीचा उमेदवार आहे, असे समजून सर्वांनी तन, मन, धनाने एकजुटीने काम करावे."चेअरमन अनिल सावंत यांनी सांगितले की, 'सत्ता परिवर्तनासाठी आम्ही नेहमीच महाविकास आघाडीच्या पाठीशी राहणार आहोत. इच्छुक उमेदवारांनी आतापासून जनतेशी संपर्क साधावा.'

आमदार अभिजित पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हटले, 'उमेदवार जनमानसात मिसळणारा, लोकांशी जुळणारा असावा. विरोधकांच्या हालचालींवर लक्ष ठेवून मतदार यादीची पडताळणी करावी.' बैठकीचे सूत्रसंचालन पंढरपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आदित्य फतेपूर यांनी केले. या प्रसंगी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'मिशन स्वाभिमान' विशेष कर संकलन करणाऱ्या ग्रामपंचायतीचा विशेष सन्मान




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत "मिशन स्वाभिमान" ही विशेष कर संकलन मोहीम जिल्हा परिषद सोलापूर मार्फत राबविण्यात येत आहे. या मोहिमेत उत्कृष्ट करसंकलन केलेल्या ६६ ग्रामपंचायतीचा गौरव जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात या समारंभाचे आयोजन करणेत आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तालुक्यातील 3000 पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या तीन ग्रामपंचायती व 3000 पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या तीन ग्रामपंचायतींना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),सुर्यकांत भुजबळ, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वर्ग (१) मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन स्मिता पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, पं.स उत्तर सोलापूरचे सहाय्यक गट विकास अधिकारी चे बी.सी.पाटील, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव प्रमुख उपस्थित होते.

या मोहिमेचा मुख्य उद्देश ग्रामपंचायतींच्या स्वारस्यपूर्ण सहभागातून 100% कर संकलन साध्य करणे असून, आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये मार्च 2026 अखेरपर्यंत हे उद्दिष्ट गाठण्याचा निर्धार आहे.विशेष कर संकलन दिन या मोहिमेअंतर्गत दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विशेष कर संकलन दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रास्तविक भाषणात उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. या दिवशी अधिकाधिक कर संकलन करणाऱ्या सदर कार्यक्रमास सन्मानीय सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व एक ग्रामपंचायत कर्मचारी यांना आमंत्रित करण्यात आले होते. "मिशन स्वाभिमान कार्यक्रमाचे संचालन. शिवराज राठोड, सुहास चेळेकर यांनी केले. आभार सचिन जाधव यांनी मानले.

घरकुलाचा कामे प्राधान्याने पुर्ण करून सोलापूर जिल्हा राज्यात अग्रणी ठेवा- अति. सिईओ संदीप कोहिणकर मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मध्ये आपल्या जिल्हातील ग्रामपंचायतीचा राज्यात पहिल्या क्रमांक मिळवणे हे आपले अंतिम ध्येय असून यासाठी जिल्हा प्रशासन आपणास सहकार्य करण्यास तयार आहे. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे संकल्पनेतील या अभियानात सोलापूर जिल्हा राज्यात अग्रभागी ठेवा. या साठी जिल्ह्यातील घरकुलांची कामे देखील प्राधान्याने पुर्ण करा. असेही संदीप कोहिणकर यांनी सांगितले.

### लोकवर्गणी साठी विशेष अभियान राबविणार - उप मुख्यकार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत "मिशन स्वाभिमान" विशेष कर संकलन मोहीम हे आपल्या जिल्हा परिषदेचे नाविन्यपूर्ण उपक्रम असून सदरचा पहिला टप्पा असून यापुढे दुसरा टप्पा दिनांक १५ नोव्हेबर नंतर राबविणार आहोत.तरी आपल्या कर संकलन वसुली मोहिमे मध्ये सातत्य कायम ठेवण्याचे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ यांनी केले. माझ गाव माझ तीर्थक्ष मोहीम राबविण्यात येणार आहे.

गावातून कामानिमित बाहेर गावी गेलेले,उच्च पदावर कार्यरत असणारे, वेगवेगळ्या क्षेत्रात नावलौकिक केलेल्या भूमिपुत्राकडून लोकवर्गणी जमा करून गावातील शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत बळकटीकरण करणार असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

# सोलापूर जिल्हा परिषदेत ई-निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचार?

## शासनाला कोट्यवधींचे नुकसान, संघटनांचा आंदोलनाचा इशारा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या ई-ऑनलाईन निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर अनियमितता व आर्थिक व्यवहार होत असल्याचा गंभीर आरोप विविध कंत्राटदार संघटना, अभियंता संघटना तसेच बिल्डर्स असोसिएशनने केला आहे. या प्रक्रियेमुळे शासनाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा ठपका ठेवत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवार, दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० ते ३.०० या वेळेत जिल्हा समाजकल्याण केंद्र, रंगभवन, जिप शेजारी, सोलापूर येथे महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत सर्व कंत्राटदार, अभियंते, मजूर संस्था व संबंधित संघटनांचे सदस्य सहभागी होणार आहेत.

### अनियमिततेचे गंभीर आरोप

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य मजूर सहकारी संस्था आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, ग्रामसचिव, जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांना २६ मार्च, २ सप्टेंबर, ८ ऑक्टोबर आणि २८ ऑक्टोबर २०२५ रोजी तक्रारी दिल्या आहेत.

या तक्रारींनुसार, ई-ऑनलाईन निविदा प्रक्रिया फक्त नावालाच असून, प्रत्यक्षात ठरवून नियमबाह्य अटी घालून निविदा विशिष्ट व्यक्तींनाच मंजूर केल्या जात आहेत. इतर पात्र कंत्राटदारांना किरकोळ कारणे देऊन अथवा गैरलागू कागदपत्रांची मागणी करून स्पर्धेतून बाद करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### ग्रामसचिवांकडून चौकशी आदेश, पण कारवाई नाही

ग्रामसचिव एकनाथ डवले यांनी २ सप्टेंबर २०२५ रोजी या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले होते. मात्र, अद्याप कोणतीही चौकशी सुरू झालेली नाही, याबाबत संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### अधिकाऱ्यांवर आरोप

या निविदा प्रक्रियेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखापाल आणि निविदा लिपीक यांच्या संगनमताने आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. मागील दीड-दोन वर्षांतील सर्व निविदांचा अभ्यास केल्यानंतर हा प्रकार स्पष्टपणे दिसून आल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

### आंदोलनाचा इशारा

संघटनांनी राज्य सरकारला ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ही बेकायदेशीर ई-निविदा प्रक्रिया थांबवावी, तसेच दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करून सखोल चौकशी सुरू करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा जिल्हा परिषदेसमोर भव्य आंदोलन करण्यात येईल आणि मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या चळवळीचे नेतृत्व महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे राज्याध्यक्ष इं. मिलिंद भोसले, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष संतोष कलगुटगी, माजी राज्याध्यक्ष दत्तामामा मुळे, मजूर सहकारी संस्थेचे जिल्हाध्यक्ष शंकरराव चौगुले, उपाध्यक्ष कांतीलाल डुबल, राज्य अभियंता संघटनेचे सचिव कैलास लांडे, राज्य संघटक नरेंद्र भोसले, सोलापूर महापालिका कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रामभाऊ दुधाळ, पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंद तोडकरी, सचिव विवेक राठोड व राज्य संचालक सूर्यकांत बिराजदार यांनी केला आहे.

# 'कश्मीर ते कन्याकुमारी' सायकल रॅलीमध्ये बार्शीचे अमृत खेडकर यांचा सहभाग

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ यूथ अफेअर्स अँड स्पोर्ट्स यांच्या सहकार्याने तसेच फिट इंडिया मूव्हमेंट अंतर्गत, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त "कश्मीर ते कन्याकुमारी" या एकूण 4250 किमी अंतराच्या सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

ही रॅली दि. 31 ऑक्टोबर 2025 ते 18 नोव्हेंबर 2025 या कालावधीत पार पडणार असून देशभरातील निवडक सायकलस्वार त्यात सहभागी होणार आहेत.




या प्रतिष्ठित रॅलीसाठी बार्शी सायकलिंग क्लबचे सदस्य व सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस हवालदार अमृत रोहिदास खेडकर यांची निवड झालेली आहे. ही बार्शी व सोलापूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असून, त्यांच्या सहभागामुळे जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल होणार आहे.

या निवडीबद्दल बार्शी रनर्स क्लब, बार्शी सायकलिंग क्लब, सोलापूर ग्रामीण पोलीस दल, माढा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, वृक्ष संवर्धन समिती बार्शी, सर्व मित्र परिवार यांच्या वतीने अमृत खेडकर यांना हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

तसेच सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, बार्शी उपविभागीय अधिकारी अशोक सायकर, आणि माढा पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी नेताजी बंडगर यांनीही मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सदर स्पर्धेसाठी चंद्रकांत (बप्पा) बारबोले, डॉ. कुमार जगताप, वनाधिकारी मनोज बारबोले, रणजीत (मामा) पाटील, अजित मिरगणे यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# जवळगाव प्रकल्पातील संपादित जमिनीवर २५ जणांचे अतिक्रमण

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या मुलासह सर्वांना नोटीस



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील जवळगाव मध्यम प्रकल्पाच्या संपादित जमिनीवर सेवानिवृत्त पाठबंधारे खात्यातील कर्मचाऱ्याचा मुला सह तब्बल २५ जणांनी अतिक्रमण केल्याचे उघड झाले आहे. या अतिक्रमण प्रकरणात पाठबंधारे विभागाने सर्वांना नोटीस बजावली असून, पुढील कार्यवाही होणार का याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या वरदहस्ताने हे अतिक्रमण झाले असल्याची चर्चा तालुक्यात सुरू आहे. विशेष म्हणजे, पाठबंधारे विभागात कार्यरत असलेल्या व्यक्तीच्या घरच्यांनीच विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. स्थानिकांमध्ये या घटनेमुळे संतापाची लाट असून, 'विभाग आपल्या लोकांवरच कारवाई करणार का?' असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज पोलीस स्टेशनच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अकलूज येथे रन फॉर युनिटी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होती.यात शालेय विद्यार्थी,डॉक्टर असोसिएशन, व्यापारी असोसिएशन, मेडिकल असोसिएशन, किराणा असोसिएशन, सर्व संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार, शिक्षक, नोकरदार वर्ग, नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी, पोलीस पाटील, पैलवान व व्यायाम प्रेमी यांनी या मिनी रॅली मध्ये सहभाग घेतला होता.उपविभागीय अधिकारी संतोष वाळके व पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांच्या मार्गदर्शनखाली या मिनी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त रन फोर युनिटी एकता दौडचे आयोजन करण्यात आले होते सदरची एकता दौड ही अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल ते महर्षी चौक सदुभाऊ चौक, प्रतापसिंह चौक सुजयनगर, अकलूज पोलीस स्टेशन या मार्गाने सकाळी सात ते आठ या वेळेत संपन्न झाली या दौड करिता उपविभागीय अधिकारी अकलूजचे संतोष वाळके अकलूज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मिरज उबाळे तसेच पोलीस अधिकारी अमलदार विद्यार्थी नागरिक पत्रकार डॉक्टर पोलीस पाटील असे एकूण दीडशे नागरिक उपस्थित होते.


## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

बिलाल चांदसाब कुरेशी,वय -४५ वर्षे. धंदा- व्यापार रा. मोहोळ ता.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

मोहोळ नगरपरिषद, मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांच्या बिलाल चांदसाब कुरेशी जन्म दि.२८/५/१९८१ रोजी मौजे मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार बिलाल चांदसाब कुरेशी यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारिख वरील प्रमाणे मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९८१ चे आभिलेखात अशी जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माचीनोंद दुरुस्त करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१५/११/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ३०/१०/२०२५

सही/- शिक्का तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

रामचंद्र नरहरी गुंड रा.खंडोबाचीवाडी ता.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत खंडूबाचीवाडी ता. मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा आदर्श रामचंद्र गुंड जन्म दि.१५/७/२०१० रोजी खंडो बाचीवाडी ता.मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला आदर्श रामचंद्र गुंड यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै २०१० चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.१५/११/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ३१/१०/२०२५

सही/- शिक्का तहसिलदार,मोहोळ.


# हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते यांना रस्त्यावर दुकान लावण्यास प्रतिबंध

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. 02 नोव्हेंबर, 2025 रोजी असून, दि.26 ऑक्टो. ते 05 नोव्हें. कार्तिक यात्रा सोहळयासाठी सुमारे 08 ते 10 लाख भाविक पंढरपूरला येतात. यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते साहित्य विक्रीसाठी रस्त्यावर बसलेले असतात. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विक्रेत्यांचा त्रास होऊ नये यासाठी, शिवाजी चौक परीसर, श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात साहित्य विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (2) अन्वये दि. 31 ऑक्टो रोजी सकाळी 08.00 ते 05 नोव्हेंबर 2025 रोजीचे रात्री 08.00 पर्यंत या कालावधीत हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते, फिरते विक्रेते तसेच उक्त परीसरातील दुकानदार यांना अतिक्रमण करण्यास, रस्त्यावर दुकान लावणे, साहित्य विक्री करणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी पोलीस प्रशासनाने करावी. सदर आदेशाचे उल्लंघन झालेस उल्लंघन करणारेविरुध्द भारतीय न्याय संहिता 2023 मधील कलम 223 अन्वये कारवाईस पात्र राहिल. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# हॉटेलमध्ये अवैधरित्या वापर होणारे 10 घरगुती गॅस सिलेंडर जप्त

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सद्या पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेचा सोहळा सुरु झाला आहे. त्यामुळे पंढरपूर शहर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते. या गर्दीमध्ये घरगुती सिलेंडरचा अवैद्यरित्या वापर केल्यास मानवी जीवित हानी होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन दि. 28 रोजी तहसीलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहरात अवैधरित्या घरगुती गॅसचा हॉटेलमध्ये वापर होत असल्याच्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. यामध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा वापर व्यावसायीक कामासाठी करताना जप्त करण्यात आले तर व्यावसायीक वापरातील तीन गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.



कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभुमिवर पुरवठा निरीक्षक विजय बादल, पोलीस उपनिरीक्षक श्री.पिसाळ तसेच पुरवठा शाखेतील महसूल सहाय्यक उमेश हिंगमिरे, नेताजी ओव्हाळ यांच्या संयुक्त पथक कार्यरत आहे. पंढरपूर शहरातील मंदिर परिसर, प्रदक्षणा मार्ग, उज्वला सेतू लगत, गजानन महाराज मठालगत घरगुती वापरातील गॅस सिलेंडरचा वापर करणाऱ्या हॉटेल मधून घरगुती वापरातील एकूण सात सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. तर व्यावसायिक वापरातील तीन गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

कार्तिकी यात्रेत येणारे लाखोंच्या संख्येने भाविक पाहता पंढरपूर शहर व परिसरातील हॉटेल विक्रेते यांना घरगुती गॅसचा वापर न करता व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर करण्याचे प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले.


## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

कामिना अशोक भवर रा.यावली ता.मोहोळ जि.सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत यावली ता. मोहोळ } सामनेवाला

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची मुलगी सायली अशोक भवर जन्म दि.४/५/२००३ रोजी यावली ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदार याने सदर सामनेवाला सायली अशोक भवर यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे २००३ चे आभिलेखात अर्जदार यांच्या जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१५/११/२०२५ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. ३०/१०/२०२५

सही/- शिक्का तहसिलदार,मोहोळ.

## सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन, रेल्वे लाईन्स,पुण्यश्लोक आप्पासाहेब वारद पथ,सोलापूर-४१३००१ टेलिफोन नं:-०२१७-२७४०३५० ई मेल:drainsmc@gmail.com

**सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग**

जा.क्र/सा.आ.अ./जनि/१४१७

**जाहिर प्रसिध्दीकरणाचा मसुदा**

सोलापुर महानगरपालिका सार्व आरोग्य अभियंता कार्यालकडील ड्रेनेज विभागाकडील खाली नमूद कामाचे ई- निविदेबाबत.

Tender ID-2025_SMC_1237211_1

या कामांचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. ०१/११/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध कळावे दि.३१/१०/२०२५

सही/- **सहा अभियंता ड्रेनेज सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## जाहिर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि/नं.४०३/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

श्री. मोहन नारायण कांबळे,वय-४९ वर्षे, धंदा- शेती, रा. यावली, ता. मोहोळ जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत यावली,ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायतयावली, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची आई म्हणजेच रंजना नारायण कांबळे यांचा मृत्यु ता. १०/०७/२०१८ रोजी मौजे यावली, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची आई म्हणजेच रंजना नारायण कांबळे यांची मृत्यु दाखल्याची ता. १०/०७/२०१८ रोजीप्रमाणे मागणी नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जुलै २०१८ चे अभिलेखात अर्जदाराची आई म्हणजेच रंजना नारायण कांबळे यांच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि. ५/१२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.३१/१०/२०२५

सही/- लिपीक शिक्का सही/- तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण क्र.अभि/कावि/नं.२५७/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार सो, यांचे समोर**

मंदाकिनी भास्कर गवळी, वय-५६ वर्षे, धंदा- घरकाम, रा. अर्धनारी, पो. घोडेश्वर, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार

विरूध्द

ग्रामपंचायत अर्धनारी,ता. मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत अर्धनारी, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराची मुलगी म्हणजेच सिताबाई भास्कर गवळी हिचा जन्म ता. १५/०५/१९९१ रोजी मौजे अर्धनारी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराची मुलगी म्हणजेच सिताबाई भास्कर गवळी हिचा जन्म दाखल्याची ता. १५/०५/१९९१ रोजीप्रमाणे मागणी वरील नमुद तारखेनुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९९१ चे अभिलेखात अर्जदाराची मुलगी म्हणजेच सिताबाई भास्कर गवळी हिची जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.५/१२/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. ३१/१०/२०२५

सही/- लिपीक शिक्का सही/- तहसिलदार,मोहोळ.

# प्रभाग क्रमांक दोन मधील सर्वांगीण विकासासाठी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून उमेदवारीची मागणी करणार

## शिवसेनेचे युवा सेनेचे विधानसभा प्रमुख विजयदादा गायकवाड यांची माहिती

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला प्रभाग क्रमांक एक आणि प्रभाग क्रमांक सहा या दोन जुन्या प्रभागांचा मिळून झालेल्या प्रभाग क्रमांक दोन मधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाकडून मशाल चिन्ह घेऊन निवडणूक लढवण्याची माझी व माझ्या समर्थक शिवसैनिकांची इच्छा आहे.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारीची मागणी केली असल्याची माहिती शिवसेनेचे युवा नेते विजयदादा गायकवाड यांनी दिली.

या प्रभागातील विकासाचे सर्वांगीण प्रश्न सोडवण्याबरोबर शासन दरबारी पाठपुरावा करण्यासाठी दक्ष नगरसेवक म्हणून लोकप्रतिनिधी बनण्यासाठी प्रभाग क्रमांक दोन मधुन निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारीची मागणी पक्षाचे जेष्ठ नेते आणि माझे मार्गदर्शक दीपक गायकवाड यांच्याकडे मी आणि माज्या समर्थकांनी केली आहे. आमच्या पक्षाने संधी दिल्यास या प्रभागाच्या विकासप्रक्रियेत पूर्ण क्षमतेने सहभागी होण्यासाठी आपण सज्ज आहोत अशी घोषणाही यावेळी शिवसेनेचे युवा सेनेचे विधानसभा प्रमुख विजयदादा गायकवाड यांनी केली.

या प्रभागातील पाणी रस्ते आणि अन्य समस्या आणखी व्यापक स्वरूपात सोडवण्यासाठी माझा प्रयत्न असेल. मोहोळ शहराचा सर्वांगीण विकास हा ज्येष्ठ नेते दीपक गायकवाड यांच्याच नेतृत्वाखाली होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन निश्चितपणे शहरातील मतदार या नगर परिषदेवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच भगवा फडकवतील असा आम्हा शिवसैनिकांना विश्वास वाटतो. त्यामुळे आम्ही सर्व शिवसैनिक उमेदवारी घेऊन एकदिलाने आणि जोमाने या निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहोत असेही यावेळी विजयदादा गायकवाड म्हणाले.

# स्थानिक उमेदवार सुदाम शिंगाडेंच्या संपर्क अभियानाचा प्रभाग क्रमांक नऊ मध्ये झंझावात

## ‘अभी नही तो कभी नही’ या टॅगलाईनद्वारे शिंगाडे समर्थक एकवटले

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** आरक्षण सोडती नंतर सातत्याने गाजत असलेल्या प्रभाग क्रमांक नऊ मधील उमेदवारीवरून आता दोन मतप्रवाह स्पष्टपणे जाणवत आहेत. स्थानिक उमेदवारीला प्राधान्यक्रम म्हणत या प्रभागातून सुदाम तथा उत्तरेश्वर शिंगाडे हे निवडणूक लढविण्याच्या तयारीला लागले आहेत. त्यांनी आरक्षण सोडती पासूनच प्रभागातील बैठकावर भर देत सर्वसामान्याशी असलेला जनसंपर्क वाढवला आहे. विशेष म्हणजे निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच त्यांना असलेल्या पाठिंबा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अनेक दिग्गजांच्या मनामध्ये चलबिचल होत आहे.



यापूर्वी जुन्या प्रभाग क्रमांक १४ मध्ये असलेली दलदल चिखलाचे साम्राज्य याबाबत त्यांनी सातत्याने नगर परिषदेकडे पाठपुरावा करत मुरूम देखील आवश्यक त्या ठिकाणी टाकून घेतला. त्यांनी प्रभागातील सोयीसुविधांसाठी घेतलेली मेहनत प्रभागातील जनता विसरलेली नाही. याशिवाय नगर परिषदेकडे पाठपुरावा करत ड्रेनेज कंपनीने खोदलेले रस्ते अद्यावत कॉंक्रिटीकरण करत प्रभागातील सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. एक सर्वसामान्य कुटुंबातून आलेला एक प्रभावी चेहरा म्हणून सुदाम शिंगाडे यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या संपर्कात असलेल्या शेकडो मित्र परिवाराने अभी नही तो कभी नही या भूमिकेतून ही निवडणूक लढवायचीच असा चंग बांधल्यामुळे अनेक प्रस्थापित पक्षातील दिग्गज उमेदवारांमध्ये मतविभागणीची धास्ती आतापासूनच वाटायला लागली आहे. त्यामुळे सुदाम शिंगाडे यांची उमेदवारी नक्कीच या प्रभागातील अंतर्गत राजकारणाच्या घडामोडीमध्ये केंद्रस्थानी ठरत आहे.

सुदाम शिंगाडे यांचा या प्रभागात असलेला जनसंपर्क याशिवाय सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाण्याची त्यांची भूमिका यामुळे त्यांची उमेदवारी जमेची बाब ठरत आहे. सुदाम शिंगाडे हे जरी निश्चितपणे निवडणूक लढवणार असले तरी त्यांचा पक्ष अजून निश्चित नसल्यामुळे ते अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार की एखाद्या दिग्गज पक्षाकडून उमेदवारी खेचून घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी - पालकमंत्री गोरे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या प्रमुख यात्रांसह एकादशी दिवशी लाखो भाविक तसेच दररोज हजारो भाविक पंढरपूरला येतात. विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनासोबत चंद्रभागेचे स्नान केल्याशिवाय वारी पुर्ण केल्याचे समाधान मिळत नसते त्यामुळे वारकरी संप्रदायात विठ्ठल रुक्मिणी दर्शना एवढेच चंद्रभागेच्या पवित्र स्नानाला महत्त्व असल्याने चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी अशा सूचना, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

कार्तिक यात्रा नियोजनाबाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दीपक धोत्रे यांच्यासह संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



### पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली दर्शन रांग व पत्रा शेड येथील पाहणी

कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शनरांग, पत्राशेड येथे मंदिर समितीकडून आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या जातात. या ठिकाणी देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली. यावेळी त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्याधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते. यावेळी दर्शनरांगेतील भाविकांना मंदीर समितीकडून मोफत अन्नदान सुरु असून आज पालकमंत्री श्री गोरे यांच्या हस्ते दर्शन रांगेतील भाविकांना अन्नदान करण्यात आले. तसेच त्यांनी वारकरी भाविकांशी संवाद साधून उपलब्ध सुविधाबाबत माहिती जाणून घेतली. यावेळी मंदिर समितीकडून वारी कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली तसेच भाविकांना सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य देण्यात आले असून दर्शन रांग द्रुतगतीने चालावी यासाठी ज्यादा सुरक्षा रक्षक नेमण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मंदिर समिती व नगरपालिका प्रशासनाने चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर येथील वारी कालावधीतच स्वच्छता न करता दररोज स्वच्छता करावी. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना स्वच्छता पाहून समाधान वाटले पाहिजे. तसेच वाळवंटात ज्यादा तात्पुरत्या शौचालयाची सुविधा उपलब्ध ठेवावी त्याचबरोबर वाळवंटात कायमस्वरूपी पर्यावरण पूरक शौचालय स्थापन करण्याबाबतचे नियोजन करावे. उघड्यावर शौचालयास बसू नये यासाठी जनजागृती व आवश्यक उपाययोजना कराव्यात. दर्शन रांगेतील भाविकांना तात्काळ व सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन तसेच दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचबरोबर भाविकांना सुरक्षा रक्षकांचा नाहक त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन, सुरक्षारक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित सुरक्षा रक्षक नेमावेत.

चंद्रभागा नदी स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते यासाठी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सुस्थितीत बोटी तसेच प्रशिक्षक कर्मचारी सज्ज ठेवावेत. महामार्ग प्राधिकरणाने अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावेत चंद्रभागा एसटी स्टँडवर स्वच्छता व सुलभ सौचालयाची व्यवस्था करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने वारी कालावधीत अवैध दारू विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोलीस प्रशासनाने वाहतूक व्यवस्थेबाबत नियोजन करावे. आषाढी वारी प्रमाणेच कार्तिकी यात्रेत भाविकांना सुविधा द्याव्यात आषाढी यात्रा कालावधीत सर्व विभागाने उत्तम नियोजन केल्याने आषाढी वारीत भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात होते त्याच पद्धतीने कार्तिक वारीतही नियोजन करावे अशा सूचनाही पालकमंत्री श्री गोरे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समिती, नगरपालिका, आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, एसटी महामंडळ, राज्य उत्पादन शुल्क, अन्न व औषध प्रशासन, महावितरण आदी विभागांचा आढावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी घेतला.

# नातेपुते पोलीस ठाण्याच्या वतीने मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते पोलीस ठाण्याच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस या योजनेअंतर्गत रन फॉर युनिटी दोन किलोमीटर मिनी मॅरेथॉन स्पधेर्चे आयोजन ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा वाजता नातेपुते पोलीस ठाणे येथे करण्यात आले होते.

नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांच्या शुभहस्ते उद्घाटन करून मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या स्पर्धकांना झेंडा दाखवून स्पर्धेसाठी सोडण्यात आले. स्पधेर्साठी नातेपुते व परिसरातील नागरिक व युवक तसेच यश करिअर अकॅडमीचे विद्यार्थी परिसरातील पोलीस पाटील, पोलीस कर्मचारी व पोलिस अंमलदार सहभागी झाले होते. स्पर्धेमध्ये विजय मिळवलेल्या स्पर्धकाला सपोनि महारुद्र परजणे यांच्या शुभहस्ते मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सरदार वल्लभ भाई पटेल हे भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर देशाचे पहिले गृहमंत्री व उपपंतप्रधान झाले होते. हिंदुस्थानातील अर्थ स्वयंत संस्थानाचे भारतात विलीनीकरण करून घेण्याचे कार्य केल्याने त्यांना भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखू लागले. भारताची एकता आणि अखंडता यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्याचे प्रतीक म्हणून राष्ट्रीय एकता दिवस या योजनेअंतर्गत रन फॉर युनिटी ही मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. त्यांच्या कायार्ची ओळख तरुणांना झाली पाहिजे त्यांनी जपली पाहिजे. मॅरेथॉन धावणे शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे कारण ते सहनशक्ती वाढवते आणि तणाव कमी करते.

**- महारुद्र परजणे,** (सपोनि नातेपुते पोलीस ठाणे)

# पयार्यी रस्ता खुला केल्याने टेंभुर्णीच्या शेतकऱ्यांचे उपोषण स्थगित



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभूर्णी ता.माढा येथील बंद केलेला रस्ता खुला करण्यासाठी मातंग एकता आंदोलनचे रामभाऊ वाघमारे व शेतकरी संघटनेचे चंद्रकांत कुटे यांनी शेतकऱ्यांसह बुधवारी दि.२९ रोजी चालू केलेले आमरण उपोषण गुरुवार दि.३० रोजी भाड्याचे तहसीलदार संजय भोसले यांनी शिष्टाई करीत शेतक-यांना पयार्यी रस्ता खुला करून दिल्याचे लेखी दिल्यानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.

टेंभूर्णी कुर्डुवाडी रोडवरून गट नं. १०४२, १०४२/अ, १०४२/४३, १०४३,१०३५/३६०६, १०४१/४२ या गटात व इतर शेतकऱ्यांचा येण्या जाण्याचा शेकडो वर्षे जुन्या वहीवाटीच्या रस्ता सुमारे तीन वषार्पासून बंद केला आहे. शेतमाल काढून बाजारपेठेत विक्रीसाठी नेता न आल्याने मोठे नुकसान झाल्याने शेतकरी सखाराम श्रीपती ननवरे व सौ. लक्ष्मी पोपट ननवरे या दोन शेतक-यांचा धक्का बसून मृत्यू झाला आहे.तसेच या भागातील पशुधन व विद्यार्थी विद्यार्थिनींना शाळेत जाणे येण्यासाठी गैरसोयीचे होत असल्याने बुधवार दि.२९ पासून शेतक-यांनी उपोषण चालू केले होते.त्याची दखल घेऊन तहसीलदार संजय भोसले यांनी परिसरातील शेतकरी गट नं. १०४२,१०४३,१०३५/३६ या जमिनी मध्ये जाणे येणे रस्त्यासाठी गट नं. १०३८ व १०४४ याचे बांधावरील नकाशातील रस्ता खुला करण्यासाठी दोन्ही गटाचे जमीन धारक बळीराम गोसावी व सतीश होटकर यांचेशी चर्चा करून बांधारील रस्ता सहमतीने अतिक्रमण काढून नुकसान भरपाई देऊन तोडगा क रस्ता सुरु करणेस मान्यता दिलेली आहे.यावेळी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाटील चांदजकर,प्रा.सुहास पाटील, पंचायत समिती सदस्य वैभव कुटे, रामभाऊ शिंदे, वडार पँथरचे राजकुमार धोत्रे, बहुजन मुक्ती पार्टीचे महेंद्र सोनवणे, मंडल अधिकारी गंगासागर सोनवणे,अनिल गवळी, बाळासाहेब बागाव, सचिन लोंढे-पाटील, सुरेश कुटे,शरपुद्दीन मुद्राची, योगेश दाखले, सतीश जगताप, अनिल जगताप,रूपेश वाघमारे, विशाल जगताप,यांनीही शेतकऱ्यांचे समेट घडविण्यासाठी प्रयत्न केला..यावेळी मातंग एकता आंदोलन चे जिल्हाध्यक्ष रामभाऊ वाघमारे,स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे चंद्रकांत कुटे, पोपट ननवरे,अजिनाथ कुटे, समाधान ननवरे, संतोष ननवरे, सुभाष ननवरे,संजय माळी,बळी ढगे हे शेत क-यांनी उपोषण तहसीलदार संजय भोसले यांचे हस्ते ज्युस पिऊन स्थगित करण्यात आले.

# धार्मिक अल्पसंख्यांक बहुल संस्थांसाठी पायाभूत सुविधा अनुदान योजनेसाठी प्रस्ताव द्यावेत

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णय, दिनांक 07 ऑक्टोबर 2015 तसेच शासन निर्णय व शासन परिपत्रक दिनांक 28 ऑक्टोबर 2025 अन्वये सन 2025-26 या वषार्साठी धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपालिका/नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजनेअंतर्गत प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी शासन निर्णयातील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या पात्र संस्थांनी सन 2025-26 साठीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय (नियोजन शाखा), सोलापूर यांचेकडे दिनांक 14 नोव्हेंबर 2025 पूर्वी सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी दिलीप पवार यांनी केले आहे.




# वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज - उपविभागीय पोलीस अधिकारी डगळे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी शुद्ध एकादशी 02 नोव्हेंबर 2025 रोजी असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.



- **3 हजार 57 पोलीस अधिकारी व कर्मचारी**
- **7 ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र**
- **6 ठिकाणी वाहन तळ; सुमारे 10 ते 11 हजार वाहनांची पार्कींग व्यवस्था**
- **12 वॉच टॉवर; पाच अतिक्रमण पथके**

कार्तिकी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षा तसेच अतिक्रमण मोहिमेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी 3 हजार 57 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, एक अप्पर पोलीस अधिक्षक, 12 पोलीस उपअधिक्षक, 30 पोलीस निरिक्षिक, 127 सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, 1 हजार 386 पोलीस अंमलदार व 1 हजार 500 होमगार्ड तसेच 02 एसआरपीएफ कंपनी, 04 बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके, क्युआरटी दोन पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित 10 कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने 08 ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, 65 एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी 12 वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच वारकरी भाविकांना रहदारीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी 05 अतिक्रमण पथके नेमण्यात आली आहेत. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी 7 ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे . तसेच वाहतुक नियमनासाठी शहराबाहेर 12 तर शहराअतर्गत 10 ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर 16 ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली असून या ठिकाणी सुमारे 10 ते 11 हजार वाहनांची पार्कींग व्यवस्था होणार आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. डगळे यांनी केले आहे.

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# बार्शी नगरपरिषदेच्या मतदार यादीतील तब्बल ८७८७ हरकतींचा निपटारा - अंतिम यादी प्रसिद्ध होणार

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** आगामी बार्शी नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदार यादीतील तब्बल ८७८७ हरकतींची सुनावणी पूर्ण करून त्यांचा निपटारा करण्यात आला आहे. या सर्व हरकतींवरील निर्णय राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार घेण्यात आला असून,अंतिम मतदार यादी शुक्रवार दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने जाहीर केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार बार्शी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. ८



ऑक्टोबर रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली होती.या यादीवर दि. ९ ते १३ ऑक्टोबर दरम्यान हरकती स्वीकारण्यात आल्या. मात्र मोठ्या प्रमाणात हरकती आल्यानंतर, कालावधी वाढवून १७ ऑक्टोबरपर्यंत करण्यात आला.

या कालावधीत ८७८७ हरकती प्राप्त झाल्या - ज्यामध्ये एका प्रभागातील नावे दुस या प्रभागात समाविष्ट झाल्याच्या, तसेच प्रभाग हद्दीबाहेरील नावे चुकीने समाविष्ट झाल्याच्या तक्रारींचा समावेश होता.

सर्व हरकतींवर सुनावणी प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४ आणि २७ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली.या प्रक्रियेदरम्यान अनेक नागरिक, पक्ष प्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांनी आपले म्हणणे मांडले.सुनावणी रात्री उशिरापर्यंत सुरू राहिली, आणि दि.३० ऑक्टोबर रोजी सर्व हरकतींचा अंतिम निपटारा करण्यात आला.

हरकतींवरील सुनावणी व निर्णयानंतर आता अंतिम मतदार यादी , ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी ऑनलाइन आणि कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येणार आहे.या प्रक्रियेत मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे आणि कार्यालय अधीक्षक प्रकाश वाठोरे उपस्थित होते.

नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले की, ‘मतदार याद्यांमधील पारदर्शकता आणि अचूकता राखत प्रत्येक हरकतीचा निपटारा नियमांनुसार करण्यात आला असून, आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज स्थितीत आहे.’